# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक ३१२-२२** **दिनांक १५/१०/२०२२**

## माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून पोलीस आयुक्तालयात साजरा.

माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात येत असतो. वाचन संस्कृती वाढीस लागावी तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगारभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी व वाचन संस्कृती जोपासण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता विविध कार्यक्रम आयोजीत करण्याबाबत शासनाचे निर्देश होते.

सदर उपक्रमाच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त कार्यालयामधील संवाद हॉल येथे आज दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचेवेळी कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमादरम्यान सर्वांनी राष्ट्रभक्ती, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी विषयांवरील पुस्तकांचे वाचन केले. सदर कार्यक्रमावेळी पोलीस उपआयुक्त श्री विजयकांत सागर, सहा. पोलीस आयुक्त श्री विनायक नरळे, इतर पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान उपस्थित होते.




मिरा भाईंदर वसई विरार
पोलीस आयुक्तालय
वाचन
प्रेरणा दिन
भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

---ooo---